| धाराशिव | वर्ष २५ वे | अंक ३०८ वा | शुक्रवार दिनांक २७ फेब्रुवारी, २०२६ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### आफु विरुध्द आंबी पोलीसांची कारवाई

आंबी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे :आफु विरोधी कारवाई दरम्यान आंबी पोलीसांनी दि.२४.०२.२०२६ रोजी १५.१० वा. सु. आंबी पोलीस ठाणे हद्दीत चिंचपुर बु. शिवार ता. परंडा येथे छापा टाकला. यावेळी लक्ष्मण वय ८१ वर्षे, संजय वय ४५ वर्षे, महेश वय २५ वर्षे, सर्व रा. चिंचपुर बु. ता. परंडा जि. धाराशिव हे १५.१० वा. सु. चिंचपूर बु. शिवार येथे आफुची झाडे एकुण ५ किलो ३६६ ग्रॅम वजनाची एकुण ८०,८०० किंमतीचे स्वत:चे फायद्यासाठी बेकायदेशीररित्या विनापरवाना लागवड व जोपासना करत असताना आंबी पो. ठाणेच्या पथकास मिळून आले. यावरुन पोलीसांनी जुगार साहित्यासह रक्कम जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम-१२ (अ) अन्वये आंबी पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### कपाटातील सोन्या-चांदीचे दागिणे व घर उपयोगाच्या साहित्याची चोरी

भुम (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे : फिर्यादी नामे- सावित्रा उल पवार, वय ४० वर्षे, रा. पाथरुड ता. भुम जि. धाराशिव या उसतोडीचे कामानिमीत्त बाहेरगावी गेलेले असता त्यांचे राहते घराचे कुलूप अज्ञात व्यक्तीने दि.२२.०२.२०२६ रोजी सायंकाळी तोडून आत प्रवेश करुन घरातील लोखंडी कपाटातील सोन्या चांदीचे दागिने व घरउपयोगी साहित्य व रोख रक्कम १५०० असा एकुण ३८,००० किंमतीचा माल चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- सावित्रा पवार यांनी दि.२५.०२.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भुम पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३३१(३), ३०५, ३२४(४) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### बसमध्ये चढताना सत्तरहजार मारले

उमरगा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नामे- तुळसाबाई परमेश्वर गायकवाड, वय ४८ वर्षे, रा. कसगी ता. उमरगा जि. धाराशिव यांचे उमरगा ते कलबुर्गी बस मध्ये प्रवास करत असताना बॅग मध्ये ठेवलेले ७०,००० रोख रक्कम अनोळखी दोन महिलांनी दि.२४.०२.२०२६ रोजी ०२.३० वा. सु. गर्दीचा फायदा घेवून चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-तुळसाबाई गायकवाड यांनी दि.२५.०२.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन उमरगा पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### येरमाळ्यातून मोटारसायलची चोरी

परंडा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नामे- तानाजी लक्ष्मण नागटिळक, वय ५३ वर्षे,रा. येडशी ता. जि. धाराशिव यांची अंदाजे ४०,००० किंमतीची मोटरसायकल भारत पेट्रोलपंप जवळ येरमाळा येथुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी दिल्याने परंडा पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

## बनावट परिवहन वेबसाइट्स व खोट्या e- चलन लिंकपासून सावध रहा

धाराशिव (जिमाका) परिवहन विभागाच्या निर्दशनास आले आहे की,अलीकडील काळात ड्रायव्हिंग लायसन्स,वाहन नोंदणी, ई-चलन आदी सेवांशी संबंधित बनावट वेबसाइट्स,फसवे मोबाईल ॲप्स (APK) तसेच मोबाइल SMS/WhatsApp द्वारे पाठविण्यात येणाऱ्या खोट्या लिंकच्या माध्यमातून नागरिकांची मोठ्या प्रमाणात फसवणूक केली जात आहे.या प्रकारांमुळे वाहन चालक व मालकांची आर्थिक फसवणूक,वैयक्तिक माहितीची चोरी तसेच ओळख गैरवापराच्या घटना वाढत असल्याचे आढळून आले आहे.

या पार्श्वभूमीवर सर्व वाहन चालक/मालकांनी केवळ परिवहन विभागाच्या अधिकृत शासकीय संकेतस्थळांचाच वापर करावा,असे आवाहन करण्यात आले आहे. अधिकृत संकेतस्थळे पुढीलप्रमाणे आहेत :

१) वाहन नोंदणी सेवा (VAHAN) -https://vahan.parivahan.gov.in

२) ड्रायव्हिंग लायसन्स सेवा (SARATHI) - https://sarathi.parivahan.gov.in

३) परिवहन सेवा - https://www.parivahan.gov.in

४) ई-चलन पोर्टल - https://echallan.parivahan.gov.in

वरील सर्व अधिकृत संकेतस्थळे .gov.in या डोमेनने समाप्त होतात. .com, online, site, in अशा डोमेनवरील कोणतीही संशयास्पद वेबसाइट नागरिकांनी उघडू नये,असे स्पष्ट करण्यात आले आहे.

फसवणूक करणाऱ्यांकडून पाठविले जाणारे संदेश प्रामुख्याने खालीलप्रमाणे असतात :

- आपल्या वाहनाचे चलन बाकी असून त्वरित दंड न भरल्यास कारवाई होईल, अशी धमकी देत अनधिकृत लिंक पाठविणे.

ADL (वाहन चालविण्याचा परवाना) सस्पेंड होणार आहे. त्वरित तपासणी करा.अशा प्रकारचे संदेश पाठविणे. परिवहन विभाग किंवा ठढज कार्यालयाकडून नागरिकांच्या मोबाईलवर कधीही WhatsApp किंवा इतर मोबाईल ॲपद्वारे पेमेंट लिंक पाठविली जात नाही,याची विशेष नोंद घ्यावी,असेही विभागाने स्पष्ट केले आहे.

तसेच RTO Services. apk, mParivahanšUpdate. apk, eChallanš Pay.apk अशा अनधिकृत APK ॲप्स किंवा लिंक डाउनलोड करू नयेत.अशा ॲप्सच्या माध्यमातून OTP, बँकिंग माहिती तसेच मोबाईलमधील इतर संवेदनशील माहिती चोरीला जाण्याची शक्यता असते.

कोणताही संशयास्पद संदेश किंवा लिंक प्राप्त झाल्यास नागरिकांनी तात्काळ पुढील ठिकाणी तक्रार नोंदवावी :

- नॅशनल सायबर क्राईम पोर्टल - https://www.cybercrime.gov.in

- सायबर फसवणूक हेल्पलाइन - १९३० ही आहे.सर्व वाहन चालक,मालक तसेच नागरिकांनी सायबर फसवणुकीपासून सावध राहून योग्य ती दक्षता घ्यावी. अधिकृत माहितीसाठी संबंधित प्रादेशिक परिवहन कार्यालय किंवा वाहतूक विभागाशी संपर्क साधावा,असे आवाहन उपप्रादेशिक परिवहन अधिकारी परिवहन अधिकारी हर्षल डाके यांनी केले आहे.

## आफुच्या झाडाची लागवड करणाऱ्यावर गुन्हा दाखल

धाराशिव (प्रतिनिधी)- धाराशिव ग्रामीण पोलीस ठाणे :दि.२३.०२.२०२६ रोजी पोलीस निरीक्षक- श्री. मोरे पोलीस ठाणे धाराशिव ग्रामीण यांना गुप्त बातमीदारा मार्फत माहिती मिळाली की, वाघोली शिवारातील शेत गट नं १४९/१ मध्ये इसम अजित , रा. वाघोली ता. जि. धाराशिव यानी त्याचे शेतात आफुच्या झाडाची लागवड केलेली आहे.

अशी खात्रीशीर बातमी मिळाल्यावरुन बातमीच्या ठिकाणी हजर रहा असे सांगीतले वरुन स्टाफ सह सदर ठिकाणी जाउन नमूद इसमास अफुच्या झाडाची लागवडी बाबत चौकशी केली असता त्यांने सदर शेतात आफुच्या झाडाची लागवड केल्याचे सागिंतले असता सदर शेतातील ८५ किलो १७५ ग्रॅम वजनाचा अफु एकुण १२,७७,६२५ किंमतीचा माल मिळून आल्याने सदर माल त्याचा सविस्तर पंचनामा करुन जप्त करुन ताब्यात घेउन आफुची लागवड करणारे अजित सुरवसे यांचेविरुध्द एन. डी. पी. एस कायदा ८(ब),१८ अन्वये गुरंन ४३/२०२६ असा गुन्हा धाराशिव ग्रामीण पो.ठा. येथे २४.०२.२०२६ रोजी नोंदवला आहे.

सदरची कामगीरी ही मा. पोलीस अधीक्षक श्रीमती रितु खोखर, अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती शफकत आमना यांच्या मार्गदर्शनाखाली धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्याचे प्रभारी पोलीस निरीक्षक श्री. मोरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक हाके, पोलीस हावलदार भिमराव ढगे, पोलीस अमंलदार आरसेवाड, चालक पोलीस अमंलदार बनाळे, महिला पोलीस अंमलदार जाधव यांचे पथकाने केली आहे.

## राज्यस्तरीय मूल्यांकन समितीची भाटशिरपुरा प्राथमिक शाळेला भेट; ‘नंदनवन’ घडविल्याचे गौरवोद्गार




कळंब, दि. २५ (प्रतिनिधी) - मुख्यमंत्री ‘माझी शाळा सुंदर शाळा’ अभियानांतर्गत लातूर शिक्षण विभागातून प्रथम क्रमांक पटकावलेल्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भाटशिरपुरा येथे राज्यस्तरीय मूल्यांकन समितीने भेट देऊन सखोल पाहणी केली. निकषानुसार शाळेच्या सर्व बाबींचे परीक्षण करण्यात आले. राज्याच्या प्राथमिक शिक्षण विभागाचे प्रमुख तथा मूल्यांकन समितीचे प्रमुख शरद गोसावी (प्राथमिक शिक्षण संचालक, पुणे) यांच्या नेतृत्वाखाली समितीने शाळेची गुणवत्ता, भौतिक सुविधा, शैक्षणिक उपक्रम, विद्यार्थ्यांची क्षमताधिष्ठित प्रगती यांचा आढावा घेतला. समितीत विभागीय उपसंचालक डॉ. गणपत मोरे (पुणे), जिल्हा परिषद अकोला येथील प्राथमिक शिक्षणाधिकारी रतनसिंह पवार, सदस्य सचिव (जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, अकोला) वरिष्ठ अधिव्याख्याता अंकुश ससाने तसेच नगरपरिषद वाशिमचे प्रशासन अधिकारी नंदकिशोर मिटकरी यांचा समावेश होता.

यावेळी धाराशिवचे माध्यमिक शिक्षणाधिकारी नागेश मापारी, प्राथमिक शिक्षणाधिकारी डॉ. रवींद्र खंदारे, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. दयानंद जटनुरे, गटशिक्षणाधिकारी धर्मराज काळामाते, शिक्षण विस्तार अधिकारी श्रीमती किशोरी जोशी, संभाजी जगदाळे आदी उपस्थित होते.

समितीने प्रत्येक वर्गात जाऊन विद्यार्थ्यांची गुणवत्ता तपासली. शाळेतील अद्ययावत सुविधा, स्वच्छ व सुबक परिसर, शैक्षणिक साहित्य, डिजिटल साधने आणि उपक्रमशील वातावरण पाहून समितीने समाधान व्यक्त केले.

याप्रसंगी प्रमुख शरद गोसावी म्हणाले, भाटशिरपुरा शाळा गेल्या तीन वर्षांपासून विभागात प्रथम क्रमांक मिळवत आहे. मुख्याध्यापक, शिक्षक आणि ग्रामस्थांच्या संयुक्त प्रयत्नातून येथे खऱ्या अर्थाने नंदनवन निर्माण झाले आहे. ग्रामीण भागातील ही शाळा इतरांसाठी आदर्श ठरावी अशीच आहे. येथे विद्यार्थी आत्मविश्वासपूर्ण व क्षमताधिष्ठित शिक्षण घेत आहेत.

शाळेच्या गुणवत्तावृद्धीसाठी श्रीकांत तांबारे, सचिन तामाने, अमोल बाभळे, नागेंद्र होसाळे, श्रीमती कालींदा मुंडे, लिंबराज सुरवसे, राजभाऊ शिंदे, श्रीमती राजकन्या तोडकर, परमेश्वर वाघमोडे, गणपत तपिसे आदी शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले.

समितीच्या स्वागतासाठी विद्यार्थ्यांनी लेझीम, बुलबुल संचालन व स्वागतगीत सादर केले. इयत्ता सातवीतील कु. समृद्धी गायकवाड व सहकाऱ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा पोवाडा सादर करून उपस्थितांची दाद मिळवली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक तथा गोविंदपुर केंद्रप्रमुख बाळकृष्ण तांबारे यांनी केले. सूत्रसंचालन कु. आनम शेख, कु. संध्या जाधव व कु. प्रणाली खाते यांनी केले, तर आभार कु. समृद्धी गायकवाड हिने मानले. शेवटी सर्व मान्यवरांचा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला.

**सलग तीन वर्षे विभागात प्रथम!**

मुख्यमंत्री ‘माझी शाळा सुंदर शाळा’ अभियानांतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भाटशिरपुरा ही शाळा सलग तीन वर्षे विभागात प्रथम क्रमांक मिळवत आहे. राज्यस्तरीय प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकासाठी समितीने प्रत्यक्ष भेट देऊन मूल्यांकन केले आहे. भविष्यातही शाळेला अधिक प्रगतीच्या दिशेने नेण्यासाठी सर्व शिक्षक व कर्मचारी कटिबद्ध असल्याचे मुख्याध्यापक बाळकृष्ण तांबारे यांनी सांगितले.

## दाऊतपुर येथे जल जीवन मिशन योजनेचे लोकार्पण : ग्रामस्थांच्या सहभागातून पाणी व्यवस्थापनाचा नवा आदर्श



धाराशिव (जिमाका)- धाराशिव तालुक्यातील मौजे दाऊदपूर येथे जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत पूर्ण झालेल्या पाणीपुरवठा योजनेबाबत जल अर्पण दिवस मोठ्या उत्साहात आज साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष, उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री. तुकाराम भालके,धाराशिवचे गट विकास अधिकारी श्री.कांबळे,कार्यकारी अभियंता (ग्रामीण पाणी पुरवठा विभाग) जि.प. धाराशिव,श्री.सुनील काटकर,कार्यकारी अभियंता (म.जि.प.) श्री.हेमंत नागदे, ग्रामीण पाणी पुरवठा विभागातील सर्व उपअभियंते तसेच कनिष्ठ अभियंते, जिल्ह्यातील सर्व शाखांचे अभियंते व टाटा अभियंते तसेच दास्तपूर गावचे सरपंच, उपसरपंच,ग्रामविकास अधिकारी व समस्त गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात योजनेच्या पायाभूत विहिरीजवळ उपस्थित मान्यवरांच्या हस्ते कलश पूजन करून करण्यात आली. त्यानंतर जि.प.प्रशालेतील विद्यार्थी- विद्यार्थिनींसह मुख्य रस्त्यावरून अभंगाचे गीत गात प्रभातफेरी काढण्यात आली.पुढे ही फेरी जि.प.आरोग्य केंद्राच्या प्रांगणात पोहोचली व कार्यक्रमाची औपचारिक सुरुवात करण्यात आली.

योजनेची प्रस्तावना व उद्दिष्टे कनिष्ठ अभियंता श्रीमती.अश्विनी साळवे यांनी स्पष्ट केली.या योजनेअंतर्गत ८ मीटर व्यासाची पायाभूत विहीर,आयव्ही विहीर,पंपिंग मशिनरी,क्लोरीन यंत्रणा, ७९५ मीटर उर्ध्ववाहिनी नलिका,३१३० मीटर वितरण नलिका,१२५ घरगुती नळजोडण्या तसेच योजनेची माहिती दर्शविणारा नामफलक उभारण्यात आला आहे.योजनेची सर्व उपांगे पूर्ण झाल्यानंतर चाचणी घेऊन योजना कार्यान्वित करण्यात आल्याची माहिती देण्यात आली.तसेच गावातील पाणी व स्वच्छता समितीतील ५ महिलांना पाणी गुणवत्ता तपासणीबाबत ऋढघ किटचे प्रशिक्षण देण्यात आल्याचे सांगण्यात आले.

श्री.कटकधोंड (कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा) यांनी योजनेबाबत मार्गदर्शन करताना योजना हस्तांतरणानंतर तिची देखभाल ही सर्व ग्रामस्थांची सामूहिक जबाबदारी असल्याचे सांगितले. पाण्याचा योग्य वापर करून संसाधन जपण्याचे आवाहन त्यांनी केले.गट विकास अधिकारी यांनीही योजना पूर्ण झाल्यामुळे गावकऱ्यांची पाण्याची समस्या मोठ्या प्रमाणात सुटली असून पाण्याचा जपून वापर करावा,असे मार्गदर्शन केले.

ग्रामविकास अधिकाऱ्यांनी संपूर्ण ग्रामीण पाणी पुरवठा विभाग तसेच उपअभियंता श्री.स्वप्नील सुंदे आणि संबंधित कनिष्ठ अभियंता यांचे योजना गुणवत्तापूर्ण पूर्ण केल्याबद्दल आभार मानले.

कार्यक्रमाच्या शेवटी गावच्या सरपंचांनी योजनेची माहिती देत भविष्यात योजनेची योग्य देखभाल व दुरुस्ती करण्यात येईल,असे आश्वासन दिले.योजना हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण करण्यात आल्याचे जाहीर करून उपस्थित सर्व मान्यवर व ग्रामस्थांचे आभार मानत कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## उमरग्यात मुलींच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर: ॲड. शीतल चव्हाण फाऊंडेशन उपाययोजनांसाठी पोलिस निरीक्षकांना दिले निवेदन



उमरगा उमरगा शहर अन् परिसरात अल्पवयीन मुलींच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर होत चालल्याच्या पार्श्वभूमीवर मंगळवारी (दि. २४) ड. शीतल चव्हाण फाउंडेशनतर्फे पोलिस ठाणे येथे निवेदन देण्यात आले.

पोलिस निरीक्षक यांना दिलेल्या निवेदनाद्वारे शहर व तालुक्यात वाढत चाललेल्या छेडछाड, पाठलाग, प्रेमाच्या जाळ्यात अडकवून पळवून नेणे या आदी प्रकारांविरोधात तातडीने कठोर उपाययोजना राबवण्यात यावे, गेल्या काही महिन्यांपासून शहरातील शाळा, महाविद्यालये व कोचिंग क्लासेसच्या परिसरात टपोरी मुलांचे घोळके वाढले असून, मुलींची छेडछाड, टिंगल-टवाळी, घुरून पाहणे, पाठलाग करणे प्रकारांत लक्षणीय वाढ झाली आहे. यामुळे विद्यार्थिनी व पालकांत भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे सामाजिक स्वास्थ्यावर त्याचा प्रतिकूल परिणाम होत आहे. त्रिकोळी येथील अल्पवयीन मुलगी दीड महिन्यांपासून बेपत्ता असल्याची ही गंभीर बाब आहे. या घटनेने परिसरात संतापाची भावना निर्माण झाली असून, या प्रकरणाचा जलद व सखोल तपास करून संबंधित मुलगी सुरक्षित परत मिळावी, याच पार्श्वभूमीवर पोलिसांनी तत्काळ उपाययोजना राबवावे, अल्पवयीन मुलींच्या सुरक्षिततेसाठी विशेष पथक स्थापन करणे, शाळा, महाविद्यालये, बसस्थानके आदी गर्दीच्या ठिकाणी पोलिस गस्त वाढवणे, टपोरी रोडरोमिओवर प्रतिबंधात्मक कारवाई करून गुन्हे नोंदवणे, छेडछाड, स्टॉकिंग व अपहरणाच्या प्रकरणांमध्ये पोस्को कायद्यांतर्गत कठोर कारवाई करावी, बेपत्ता मुलीच्या प्रकरणाचा एसआयटीमार्फत जलद तपास करावी, असे निवेदनात म्हटले आहे, निवेदनावर सत्यनारायण जाधव, ड. अर्चना जाधव, राजू भालेराव, करीम शेख, ड. ख्वाजा शेख, किशोर औरादे, धानय्या स्वामी, ज्योती माने, शबाना उडचणे-शेख यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते व नागरिकांच्या सह्या आहेत.

# महालंगी येथे 'जल जीवन मिशन' अंतर्गत पूर्ण झालेल्या योजनेचा जल अर्पण दिवस उत्साहात साजरा



धाराशिव,दि.२५ फेब्रुवारी (जिमाका ) धाराशिव तालुक्यातील मौजे महाळंगी येथे 'जल जीवन मिशन' अंतर्गत पूर्ण झालेल्या पाणीपुरवठा योजनेनिमित्त जल अर्पण दिवस आज मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.कार्यक्रमाला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष,उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री.तुकाराम भालके,गट विकास अधिकारी श्री.कांबळे,कार्यकारी अभियंता (ग्रामीण पाणी पुरवठा विभाग) श्री.सुनील कटकधोंड ग्रामीण पाणी पुरवठा विभागातील सर्व वाप्कोस उपअभियंते व शाखा अभियंते,जिल्ह्यातील सर्व संबंधित अभियंते,तसेच महालंगी गावचे सरपंच, उपसरपंच,ग्रामविकास अधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात ग्रामपंचायत प्रांगणात मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.घोष यांच्या हस्ते कलश पूजनाने करण्यात आली. त्यानंतर जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या सहभागातून गावातील मुख्य रस्त्यावर प्रभातफेरी काढण्यात आली. यावेळी 'जल जीवन मिशन'चे महत्त्व,हर घर नल से जल या घोषवाक्याचा प्रसार करण्यात आला.

शाळेच्या प्रांगणातील कार्यक्रमात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून योजनेची माहिती सादर करण्यात आली.कनिष्ठ अभियंता श्रीमती श्रीमती.पवार यांनी योजनेचे उद्दिष्ट व कामांचा आढावा मांडला.योजनेअंतर्गत ८ मीटर व्यासाची पाझर विहीर,विंधन विहीर,पंपिंग यंत्रणा, २७४२ मीटर उचल नळिका,३५ हजार लिटर क्षमतेची उंच जलकुंभ टाकी,२५६८ मीटर वितरण नलिका व ९२ घरगुती नळजोडण्या पूर्ण करण्यात आल्या.तसेच योजनेची माहिती दर्शविणारे नामफलक व सर्व उपांगांची कामे पूर्ण करून चाचणी घेतल्यानंतर योजना कार्यान्वित करण्यात आली.गावातील पाणी व स्वच्छता समितीतील पाच महिलांना पाणी गुणवत्तेची तपासणी करण्यासाठी एफटीके किटचे प्रशिक्षण देण्यात आले असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.

मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.घोष यांनी योजनेचे हस्तांतरण ग्रामस्थांकडे करताना, योजनेची देखभाल ही सर्वांची सामूहिक जबाबदारी असल्याचे अधोरेखित केले. सन २०५३ सालापर्यंतचा लोकसंख्येचा विचार करून योजना राबविण्यात आली असून पाण्याची शाश्वतता टिकवण्यासाठी जलसंवर्धनावर भर देण्याचे मार्गदर्शन त्यांनी केले.तसेच गट विकास अधिकारी व कार्यकारी अभियंता यांनीही पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहन करत योजनेची यशस्वी अंमलबजावणी केल्याबद्दल संबंधित अधिकारी व ग्रामस्थांचे कौतुक केले.कार्यक्रमाच्या शेवटी सरपंचांनी योजनेची योग्य देखभाल व दुरुस्तीचे आश्वासन देत उपस्थित मान्यवरांचे व ग्रामस्थांचे आभार मानले.

# येडशी शिवारातून दोन म्हैसी चोरल्या

धाराशिव (प्रतिनिधी)-ग्रामीण पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी मारुती ज्ञानदेव देवकर, वय ६७ वर्षे, रा. येडशी ता. जि. धाराशिव यांचे येडशी शिवारातील शेत गट नं ३५२ मधील दोन म्हैस एकुण १,२५,००० किंमतीच्या दि. १६.०२.२०२६ रोजी १९.०० ते दि.१७.०२.२०२६ रोजी ०६.०० वा. सु. अज्ञात व्यक्तीने चोरुन नेल्या. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-मारुती देवकर यांनी दि.२४.०२.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव ग्रामीण पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

# धाकटे पंढरपूर आळणी! भक्ती, इतिहास आणि प्रगतीचा झंझावात

**स्पेशल रिपोर्ट रामेश्वर डोंगरे**

धाराशिव तालुक्यातील आळणी हे गाव म्हणजे श्रद्धा, संस्कार, कष्ट आणि एकतेचा जिवंत इतिहास आहे. धाकटे पंढरपूर ही केवळ उपमा नाही, तर गावाच्या प्रत्येक श्वासात वसलेली ओळख आहे. या भूमीत भक्ती आहे, इतिहास आहे, आणि भविष्य घडवण्याची जिद्दही आहे.

**१) विठ्ठल-रुक्मिणी मंदिर –** गावाचे हृदयस्थान आळणीची खरी ओळख म्हणजे येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर. मंदिरातील सोन्याच्या मूर्ती हे गावाचे आध्यात्मिक वैभव आहे. या पवित्र देवस्थानाची व्यवस्था आणि परंपरा जपण्याची जबाबदारी वीर पाटील परिवाराने भक्तिभावाने सांभाळली आहे. त्यांच्या समर्पणामुळेच मंदिराचे तेज दिवसेंदिवस वाढत आहे.

आषाढी आणि कार्तिकी एकादशीला येथे भव्य सप्ताह भरतो. हरिनामाचा गजर, टाळ-मृदुंगाचा निनाद आणि भाविकांची गर्दी यामुळे गावात अक्षरशः पंढरपूरसारखे वातावरण निर्माण होते.

**२) शंकराचे जागृत देवस्थान –** श्रद्धेचा अढळ विश्वास गावात श्री शंकराचे मोठे जागृत देवस्थान आहे. संकटसमयी गावकरी येथेच नतमस्तक होतात. श्रद्धेची परंपरा पिढ्यान्पिढ्या टिकवून ठेवणारे हे स्थान आळणीच्या आध्यात्मिक बळाचे प्रतीक आहे.

**३) शेती आणि भाजीपाला – कष्टाचे सोने**

अर्धे माळरान आणि अर्धी सुपीक जमीन अशी आळणीची रचना आहे. तरीही येथे शेतकरी जिद्दीने शेती फुलवतात. विशेषतः माळी समाज भाजीपाला उत्पादनात अग्रेसर आहे. येथील ताज्या भाज्यांची बाजारात विशेष मागणी असते. कष्ट, नियोजन आणि चिकाटीमुळे आळणीचा शेतकरी आज आर्थिकदृष्ट्या सक्षम होत आहे.

**४) सामाजिक ऐक्य –** गुण्यागोविंदाने नांदणारे गाव

माळी समाज मोठ्या प्रमाणात असून मराठा समाजही बळकट आहे. याशिवाय विविध समाजांचे लोक येथे एकोप्याने राहतात. सरकारी सेवेत असलेले कर्मचारी, व्यावसायिक, शेतकरी आणि कामगार सर्वांनी मिळून गावाचा विकास साधला आहे. भेदभाव नाही, तर बंधुभाव हीच आळणीची खरी ओळख आहे.

**५) शिक्षणातही आघाडी**

गावातील प्राथमिक आणि माध्यमिक शाळा शिस्तबद्ध आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण देतात. शिक्षकांचे विद्यार्थ्यांवर विशेष लक्ष असून मुलांमध्ये मेहनतीची आणि यश मिळवण्याची जिद्द आहे. ग्रामीण भागात असूनही शिक्षणाचा दर्जा उंचावलेला आहे, ही आळणीची ताकद आहे.

**६) ऐतिहासिक ठसा –** निजामकालीन जकात नाका


निजामाच्या काळात येथे जकात नाका होता, यावरून गावाचे व्यापारी आणि प्रशासकीय महत्त्व अधोरेखित होते. इतिहासाची साक्ष देणारे हे गाव आज आधुनिकतेकडे वेगाने वाटचाल करत आहे.




**७) विकासाचा वेग –** फोर लाईन हायवेचा लाभ

संभाजीनगर-सोलापूर या प्रमुख मार्गावरील फोर लाईन हायवेवर वसलेले आळणी गाव आता विकासाच्या मुख्य प्रवाहात आले आहे. वाहतुकीची सोय, बाजारपेठेचा विस्तार आणि रोजगाराच्या संधी वाढत आहेत.

# भूममध्ये अवकाळीचा तडाखा; फळबागांसह रब्बीचेही नुकसान



भूम (प्रतिनिधी)-तालुक्यात अवकाळी पावसाचा दुसऱ्या दिवशीही जोर कायम राहिल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. अचानक ढगफुटीसदृश पाऊस, वादळी वारे आणि काही भागांत गारपीट झाल्याने द्राक्षे, आंबा, भाजीपाला, ज्वारी, हरभरा व गहू पिकांचे मोठे नुकसान झाले आहे.

मागील दोन दिवसांपासून सायंकाळच्या सुमारास ढग दाटून येत जोरदार पावसाला सुरुवात होत आहे. वादळी वाऱ्यामुळे अनेक ठिकाणी फळबागांतील फांद्या तुटल्या असून द्राक्षबागांतील मांडवांचे नुकसान झाले आहे. भाजीपाला पिकांमध्ये पाणी साचल्याने कुजण्याचा धोका निर्माण झाला आहे. काही गावांत वीजपुरवठाही खंडित झाला होता. कृषी विभागाकडून प्राथमिक पाहणी केली जाणार असल्याचे तालुका कृषी अधिकारी अतुल ढवळे यांनी सांगितले.

रब्बी हंगामाच्या तोंडावर आलेले पीक धोक्यात आले असून तातडीने मदत जाहीर करण्याची मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.


**लातूर समाचार धाराशिव**

**बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क**

**9422472502**

**9175325708**


## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४


## महाराष्ट्र शासन

**कार्यकारी अभियंता, उपसा सिंचन विभाग, धाराशिव यांचे कार्यालय**

**पत्ता. धाराशिव, आनंद नगर, सिंचन परीसर**

E-mail :- eelisdn@gmail.com दूरध्वनी क्र. ०२४७२-२९५१७१

## निविदा सूचना क्र. ०८ सन २०२५-२६ (ऑफलाईन)

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने **कार्यकारी अभियंता, उपसा सिंचन विभाग, धाराशिव,** जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरीता निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे विभागीय कार्यालयातून विहीत शुल्क भरुन प्राप्त करुन घेण्यात यावीत. सविस्तर निविदा सूचना विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, उपसा सिंचन विभाग, धाराशिव यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर कळविण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| १. | **कामाचे नांव :** | शासकीय सिंचन वसाहत, आनंद नगर, धाराशिव येथील कर्मचारी निवासस्थान वर्ग - ड मधील विद्युत कामे करणे. ता. जि. धाराशिव |
| २. | **जिल्हा :** | धाराशिव (महाराष्ट्र राज्य) |
| ३. | **निविदेची किंमत :** | रु. ०९.९८ लक्ष (वस्तु व सेवाकर वगळता) |
| ४. | **निविदा विक्री :** | दि.०२/०३/२०२६ ते ०९/०३/२०२६ |
| ५. | **निविदा सादर करण्याचा कालावधी:** | दि.०२/०३/२०२६ ते १०/०३/२०२६ |
| ६. | **निविदा उघडण्याचा दिनांक :** | दि. १२/०३/२०२६ रोजी शक्य असल्यास किंवा त्यापुढे |
| ७. | **इसारा / बायना रक्कम :** | रु. १०,०००/- |
| ८. | **काम पूर्ण करण्याचा कालावधी :** | ०३ महिने |
| ९. | **निविदा संचाची किंमत** | रु.१०००/- +जी.एस.टी. १८% एकुण रु. ११८०/- |
| १०. | **कंत्राटदाराचा नोंदणी वर्ग :** | सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत पंजीकृत केलेल्या पात्र व नोदणीकृत धाराशीव जिल्ह्यातील शासकीय विद्युत कंत्राटदार (वर्ग क आणि पुढील) |

१. वरील कामाची निविदा दोन स्वतंत्र लिफाफ्यामध्ये भरुन पाठवायची आहे.
२. जर निविदा पोष्टाने पाठविल्यास मोहरबंद लिफाफा देवाण-घेवाण करण्यात खराब झाल्यास किंवा निविदा मिळण्यास कोणताही विलंब झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.
३. कार्यकारी अभियंता, उपसा सिंचन विभाग धाराशिव यांच्या कार्यालयात निविदा स्विकारण्यात व उघडण्यात येतील.
४. लिफाफा क्र. १ मध्ये, सां. बा. वि. नोंदणी प्रमाणपत्र, आयकर विवरण पत्र, जी.एस.टी. नोंदणी प्रमाणपत्र, पॅन काड इ.कागदपत्रे देण्यात यावीत. लिफाफा क्र. २ मध्ये उपरोक्त नमुद कामाचे दर देण्यात यावेत.
५. लिफाफा क्र. १ मधील कागद पत्रांची पडताळणी करुन पात्र स्पर्धकांचेच लिफाफा क्र. २ उघडण्यात येतील.
६. सदर निविदा अंशतः स्वीकारण्याचा, अंशतः नाकारण्याचा, पूर्ण नाकारण्याचा, निविदा प्रक्रिया रद्द करण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरीधारकांनी राखून ठेवला आहे
७. कंत्राटदाराने निव्वळ कामाच्या किंमतीवर दर सादर करावेत.

**जा.क्र.उसिंवि/निविदा/५६१/२०२६**
**कार्यकारी अभियंता उपसा सिंचन विभाग, धाराशिव यांचे कार्यालय.**
दि. २६/०२/२०२६

**स्वाक्षरीत/-**
**कार्यकारी अभियंता,**
**उपसा सिंचन विभाग, धाराशिव,**

जिमाका/एके/जाहि/१४९


# आदेशाचा बॉम्ब फुटला! २० मार्चपूर्वीच जिल्हा परिषदांची पहिली सभा - ग्रामीण राजकारणात जोरदार खळबळ!

धाराशिव (रामेश्वर डोंगरे )-राज्याच्या ग्रामीण राजकारणात अखेर मोठा स्फोट झाला आहे! ग्रामविकास विभागाकडून प्रतीक्षेत असलेले पत्र अखेर जिल्हा प्रशासनाकडे धाडण्यात आले असून, २० मार्च २०२६ पूर्वी सर्व जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या पहिल्या सभा घेण्याचे स्पष्ट आदेश देण्यात आले आहेत. निवडणुका पार पडूनही पहिल्या सभेचा मुहूर्त ठरत नसल्याने राजकीय वर्तुळात संभ्रमाचे वातावरण होते. मात्र आता शासनाच्या या आदेशाने राजकीय समीकरणांना चांगलाच वेग आला आहे.

**सत्तास्थापनेसाठी धावपळ सुरू**

पहिल्या सभेत अध्यक्ष-उपाध्यक्ष पदांची निवड होणार असल्याने जिल्हा पातळीवरील सर्व पक्षांनी आपली रणनीती आखण्यास सुरुवात केली आहे. बहुमत असलेल्या गटांमध्येही अंतर्गत चुरस वाढली असून, कोणाच्या गळ्यात अध्यक्षपदाची माळ पडणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**कायद्यानुसार महत्त्व**

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ नुसार, सदस्यांचा अधिकृत कार्यकाळ पहिल्या सभेपासूनच सुरू होतो. त्यामुळे २० मार्चपूर्वी सभा घेणे अनिवार्य ठरले आहे.

**जिल्हानिहाय राजकीय तापमान वाढले**

काही जिल्ह्यांत स्पष्ट बहुमत असतानाही अध्यक्षपदावरून मोठी रस्सीखेच सुरू आहे. आघाड्या-युतींच्या बैठका, गुप्त चर्चासत्रे आणि लॉबिंगला वेग आला आहे. पुढील काही दिवसांत जिल्हा स्तरावर मोठे राजकीय घडामोडी घडण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

एकंदरीत, ग्रामविकास विभागाच्या या एका पत्राने ग्रामीण सत्तेच्या राजकारणात चांगलीच धुमश्चक्री माजली आहे. आता २० मार्चपूर्वी कोण कुठे बसणार, कोणाची खुर्ची पक्की होणार आणि कोणाचे स्वप्न भंगणार - याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे!


## Name of Change Declaration

Here in this advertise i am declaring that i have Change My Name which was : **PATHAN HAMID MAHEBOOB KHAN**
TO **HAMID MAHIBUB PATHAN**
Hence for this Declaration i will be known by this name and will use . in future the HAMID MAHIBUB PATHAN will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- **PATHAN HAMID MAHEBOOB KHAN.**
NEW NAME:- **HAMID MAHIBUB PATHAN** .
Address :- AT POST TAMALWADI TQ. TILJAPUR. DIST. OSMANABAD - 413623
AADHAR NO.- 9960785076
Mob. No.- 719894714327



सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649